# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७३ वी बैठक दिनांक २६ मार्च २०१३

# ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७३ वी बैठक दि. २६ मार्च २०१३ रोजी मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) यांचे मंत्रालयीन दालन (दालन क्रमांक २४१ विस्तार), मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | इं. ए. बा. पाटील | ... | प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग |
| ३. | श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. राजन शहा | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) अ.का. |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्‌नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. शि. मा. उपासे)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे.** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे.** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७३ वी बैठक दिनांक २६ मार्च २०१३

## ठराव

**ठराव क्रमांक ७३/१**

**"नियामक मंडळाच्या ७१ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."**

**ठराव क्रमांक ७३/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७२ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्रमांक ७३/३**

**"ठराव करण्यात येतो की, कार्यकारी समितीची बैठक प्रत्येक महिन्यामध्ये किमान एकदा घेण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात यावा."**

**ठराव क्रमांक ७३/४**

**"ठराव करण्यात येतो की, क्षेत्रिय अधिका-यांनी प्रगतीपथावरील प्रकल्पांना भेटी देऊन काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने व गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांची तपासणी करण्याकरीता खालीलप्रमाणे दरमहा भेटींच्या संख्येस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.**

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे. | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे. |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७३ वी बैठक दिनांक २६ मार्च २०१३

| अ. क्र. | पदनाम | कामांची तपासणी करुन निरिक्षण टिपणी निर्गमित करण्याबाबत भेटींच्या दिवसांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | दरमहा कार्यस्थळावरील कामांच्या सरासरी भेटी | वार्षिक भेटी |
| १ | शाखा अभियंता | १५ | १८० |
| २ | उप अभियंता | १६ | १९२ |
| ३ | कार्यकारी अभियंता | ०८ | ९६ |
| ४ | अधीक्षक अभियंता | ०६ | ७२ |
| ५ | मुख्य अभियंता | ०४ | ४८ |
| ६ | कार्यकारी संचालक | ०२ | २४ |

*(जर एकाच दिवशी एकापेक्षा जास्त प्रकल्पांच्या कामांना भेटी दिल्या असतील तर अशा प्रत्येक प्रकल्पाकरिता ती भेट स्वतंत्र आहे असे समजण्यात यावे. पर्यायाने एकाच प्रकल्पावरील विविध कामांना एकाच दिवशी भेटी दिल्या असतील तर ती एक भेट समजण्यात यावी)"*

**ठराव क्रमांक ७३/५**

**"ठराव करण्यात येतो की,**
**(१) ॲड विजय पाटील यांना दिनांक ३१/३/२०१५ पर्यंत उच्च न्यायालय, मुंबई येथील महामंडळांतर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत महामंडळाचे वकील म्हणून मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**
**(२) ॲड डी. डी. शिंदे हे महामंडळाचे कायदा सल्लागार असल्याने त्यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथील महामंडळांतर्गत न्यायालयीन प्रकरणे आवश्यकतेनुसार हाताळण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ७३/६**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ७०व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र. ७०/९ मध्ये नमूद सि. स. नं. ५९० ऐवजी सि. स. नं. ५९२ असा बदल करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ७३/७**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाचा मंजूर ठराव क्रमांक ७१/१० खालीलप्रमाणे सुधारित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**"मान्य"**

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे.

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे.

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७३ वी बैठक दिनांक २६ मार्च २०१३

खडकवासला प्रकल्पाची पुणे महानगरपालिका हद्दीतील मुठा उजवा कालव्याच्या काठावरील मौजे वडगांव बु. येथील जुना मुठा उजवा कालवा व नवीन मुठा उजवा कालवा यामधील एकूण २७६०० चौ. मी. जमीन वृक्षारोपणासाठी, उद्यान विकसित करण्यासाठी व उद्यानात जॉगिग ट्रॅक नागरीकांचे सोयीसाठी उभारण्यास महामंडळाचा मालकी हक्क कायम ठेवून पुणे महानगरपालिकेस खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट-१ : पुणे महानगरपालिकेने सदर जागेचा वापर कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी करु नये.

अट-२ : सदर जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने, त्यावर इतर कोणतेही अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची राहील.

अट-३ : भविष्यात सदर जागेवर पुणे महानगरपालिकेचा कोणताही हक्क राहणार नाही.

अट-४ : पुणे महानगरपालिकेने त्यांचेकडे असणारी सर्व प्रकारची थकबाकी महामंडळास प्रथम जमा करणे आवश्यक राहील.

अट-५ : प्रस्तूत जागेमध्ये वृक्षारोपण, उद्यान व जॉगींग ट्रॅक करणेबाबत महानगरपालिकेने महामंडळाबरोबर संयुक्त अभियानाचा (Joint Venture) करारनामा करावा.”

“मान्य”

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे.

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे.